**ठळक बातम्या**

- आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या कारवाईसह अनेक मुद्द्यांवरून विरोधकांचा संसदेत आजही गदारोळ/ दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब

- झारखंडमध्ये भरती परीक्षेतल्या कथित गैरप्रकाराच्या विरोधात आंदोलक विद्यार्थ्यांचा विधानसभेच्या दिशेनं मोर्चा

- झारखंड भरती परीक्षेतल्या गैरप्रकार प्रकरणात ईडीचा तपास सुरू

- देशाच्या विविध भागात आज मुसळधार पावसाची शक्यता

**आणि**

- यूक्रेननं रशियावर केलेल्या ड्रोन हल्ल्यात १२ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या चौथ्या आणि अंतिम आठवड्याला आजपासून सुरुवात झाली. मात्र, नीट पेपरफुटीवरून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या कारवाईसह अनेक मुद्द्यांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब झालं. सकाळी ११ वाजता लोकसभेचं कामकाज सुरू झाल्यानंतर पीठासीन अधिकारी एन. के. प्रेमचंद्रन यांनी प्रश्नोत्तराचा तास घेण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थी आंदोलनावर झालेल्या पोलिसांच्या अवाजवी बळाच्या वापराचा मुद्दा उपस्थित करत विरोधी पक्ष सदस्यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या निवेदनाची मागणी केली. विरोधकांच्या गदरोळातच कायदेमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी न्यायाधिकरण सुधारणा विधेयक, २०२६ सादर केलं. या विधेयकाचा उद्देश न्यायाधिकरणांच्या अध्यक्ष आणि सदस्यांच्या पात्रता, नियुक्ती, सेवाशर्ती आणि कामकाजात कार्यक्षमता, स्वातंत्र्य, पारदर्शकता आणि एकसमानता आणणं हा आहे. तसंच, केरळ राज्याच्या नावातल्या बदलाशी संबंधित विधेयक नित्यानंद राय यांनी लोकसभेत मांडलं. मात्र, आपल्या मागणीसाठी घोषणाबाजी करणाऱ्या विरोधकांचा गदारोळ वाढल्यामुळे प्रेमचंद्रन यांनी सभागृहाचं कामकाज आधी दुपारी १२ आणि नंतर वाजेपर्यंत तहकूब केलं.

याच मुद्द्यावरून राज्यसभेचं कामकाजही दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब झालं. सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा वित्त, गृहनिर्माण आणि नगरविकास, रेल्वे, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण या विभागांशी संबंधित संसदीय स्थायी समित्यांचे अहवालही सादर करण्यात आले. त्यानंतर अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी शून्य प्रहराची घोषणा केली. भाजपचे तरुण चुघ यांनी पंजाबमधली ढासळती कायदा आणि सुव्यवस्था तसंच अमली पदार्थांच्या वाढत्या धोक्याचा मुद्दा उपस्थित केला. अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे पंजाबमध्ये एका वर्षात ८९ जणांनी आपला जीव गमावला असूनही पंजाब सरकारने अंमली पदार्थांविरुद्ध कोणतीही प्रभावी पावलं उचलली नाहीत, अशी टीका त्यांनी केली. भाजपचे बाबूभाई जेसंगभाई देसाई यांनी गुजरातमधल्या चांदीपुरा विषाणू रोगाचा मुद्दा उपस्थित केला. या दरम्यान विरोधकांच्या सततच्या घोषणाबाजीमुळे कामकाज आधी १२ आणि नंतर २ वाजेपर्यंत तहकूब झालं.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवसाचं कामकाज सुरू झाल्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच आम आदमी पक्षाच्या सहा आमदारांना सभागृहाबाहेर काढण्यात आलं. आपचे आमदार विधानसभेत घालून आलेल्या टी-शर्टवर उपसभापती मोहन सिंह बिष्ट यांनी आक्षेप घेतल्यानंतर गोंधळाला सुरुवात झाली. विधानसभा अध्यक्ष विजेंद्र गुप्ता यांनी या आमदारांना त्यांचे ‘आक्षेपार्ह’ टी-शर्ट काढण्यास सांगितलं. मात्र, आपच्या आमदारांनी भाजप सरकारच्या काळातल्या कथित सायकल घोटाळ्याबाबत घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांना सभागृहाबाहेर काढण्यात आलं.

**<><><><><>**

भारतातल्या आशियाई सिंहांची संख्या वाढत असून, त्यांचा अधिवासही वाढत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक सिंह दिनानिमित्त आज सांगितलं. या प्रजातीच्या संवर्धनासाठी सरकारची अतूट बांधिलकी आणि त्याला मिळणारा मजबूत लोकसहभाग हे देशातलं वन्यजीवांचं संरक्षण करण्याचं आणि सिंहाच्या भावी पिढ्या जतन करण्याचं प्रेरणादायी उदाहरण आहे, असं प्रधानमंत्र्यांनी केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी लिहिलेला एक लेख सामायिक करत सांगितलं.

<><><><><>

भारतीय विणकर आणि डिझायनर्सनी आपलं उत्पन्न वाढवण्यासाठी बाजारपेठेच्या बदलत्या मागण्या आणि संधी ओळखून त्यांचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असं वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या सचिव नीलम शमी राव यांनी सांगितलं. नवी दिल्लीत आयोजित राष्ट्रीय हातमाग डिझायनर संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. हातमाग क्षेत्रात डिझायनर्सची भूमिका महत्त्वाची असल्याचं त्यांनी सांगितलं. भारतीय विणकर आपल्या उत्पादनांच्या डिझाइनमध्ये सुधारणा करून विक्री वाढवू शकतात, असंही त्या म्हणाल्या. या कार्यक्रमात राष्ट्रीय हातमाग डिझाईन स्पर्धेच्या विजेत्यांचा सन्मान करण्यात आला.

<><><><><>

झारखंडमध्ये भरती परीक्षेतल्या कथित गैरप्रकाराच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी जयपाल सिंह मुंडा स्टेडियमहून झारखंड विधानसभेच्या दिशेनं मोर्चाला सुरुवात केली आहे. झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोगाच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी सुरू असलेल्या आंदोलनाचा आज १७वा दिवस आहे. काही परीक्षा रद्द कराव्यात आणि कथित गैरप्रकारांची चौकशी सीबीआयमार्फत करावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी आहे. यापैकी जवळपास ९८ टक्के मागण्या मान्य केल्याचा दावा सरकारनं केला आहे. दरम्यान, विरोधी पक्षनेते बाबूलाल मरांडी यांच्यासह भाजपाच्या काही नेत्यांना मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या निवासस्थानाबाहेर निदर्शनं करताना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

दरम्यान, झारखंडमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाबाबत काँग्रेसची भूमिका दुटप्पी असल्याची टीका भारतीय जनता पक्षाने केली आहे. दिल्लीतल्या विद्यार्थी आंदोलनाविषयी राजकीय भूमिका घेणारा काँग्रेस पक्ष आता झारखंडमधल्या आंदोलनावर मौन बाळगत असल्याचं भाजपने म्हटलं आहे.

<><><><><>

सक्तवसुली संचालनालयानं झारखंडमध्ये झालेल्या विविध भर्ती परीक्षांमध्ये, विशेषतः जेएसएससी-सीजीएल परीक्षेच्या आयोजनात झालेल्या कथित अनियमिततांची चौकशी सुरु केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी आज दिली. राज्य पोलिसांनी दाखल केलेल्या एफआयआरसह इतर तक्रारींची स्वतः होऊन दखल घेत केंद्रीय तपास संस्थेनं मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत तपास सुरु केला आहे, असं अधिकाऱ्यांनी सांगितलं. झारखंडमध्ये

विद्यार्थी गेल्या १६ दिवसांपासून विविध भरती परीक्षांमधील कथित अनियमिततांची सीबीआय चौकशी करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करत आहेत.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांच्या शिवसेना प्रवेशाला मान्यता देण्याच्या लोकसभा सभापतींच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवरची सुनावणी सभापती ओम बिर्ला हजर न राहिल्यानं सर्वोच्च न्यायालयानं २ आठवडे पुढे ढकलली. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पीठानं या प्रकरणी २२ जून रोजी नोटिसा जारी केल्या होत्या.

<><><><><>

भारतीय हवामान विभागाने आज पूर्व राजस्थान, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम मध्य प्रदेशमध्ये जोरदार ते अति जोरदार पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. तसंच, आज हरियाणा, चंदीगड, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, विदर्भ आणि ईशान्य भारतात काही भागांतही मुसळधार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने आज जम्मू-काश्मीर, झारखंड, कर्नाटक, ओडिशा, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, आंध्र प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रात विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह वादळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. केरळ, माहे, तामिळनाडू, पुद्दुचेरी, रायलसीमा, तेलंगणा आणि लक्षद्वीपमध्येही अशीच हवामान स्थिती राहण्याची शक्यता आहे.

<><><><><>

युक्रेननं रशियाच्या निझ्नेकाम्स्क शहरावर केलेल्या ड्रोन हल्ल्यात १२ जणांचा मृत्यू झाला आणि इतर ३९ जण जखमी झाले. आज सकाळी युक्रेननं औद्योगिक आणि नागरी सुविधांवर हा हल्ला केला. युक्रेननं गेल्या काही महिन्यांत जवळपास दररोज रशियातल्या तेल सुविधांना लक्ष्य केलं आहे. निझ्नेकाम्स्क शहर हे रशियातलं महत्त्वाचं तेल शुद्धीकरण केंद्र आहे.

<><><><><>

इंडोनेशियामधल्या वणव्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी हेलिकॉप्टर, शेकडो अग्निशमन दलाचे जवान आणि आपत्ती व्यवस्थापन कर्मचारी तैनात करण्यात आल्याचं प्रशासनानं

सांगितलं आहे. सर्वात मोठी आग पूर्व जावा प्रांतातील ब्रोमो टेंगर सेमेरू राष्ट्रीय उद्यानात लागली असून, सुमारे ७४३ हेक्टर क्षेत्र जळून खाक झालं आहे, असंही प्रशासनानं सांगितलं आहे. इंडोनेशियाच्या वन मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार एल निनोच्या परिस्थितीमुळे ऐन कोरड्या हवामानाच्या काळात जंगल आणि जमिनीला अधिक आग लागण्याचा धोका वाढला आहे.

**<><><><><>**

शिकागोमध्ये काल झालेल्या गोळीबाराच्या विविध आठ घटनांमध्ये तिघा जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. तसंच, परवा पहाटे एका ३५ वर्षीय व्यक्तीच्या डोक्यात गोळी झाडण्यात आली. त्याची प्रकृतीही चिंताजनक आहे. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार गेल्या १२ महिन्यांत शिकागोमध्ये विविध ठिकाणी झालेल्या १ हजार ८७८ गोळीबारांच्या घटनांमध्ये ३५६ जणांचा मृत्यू झाला आहे.

//<><><><><>//